# मुलनिहाय नियोजन

## वर्ग / मूल निहाय नियोजन - संकल्पना आणि कृती कार्यक्रम

वर्गप्रक्रियेच्या नियोजनाबाबत राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF) २००५ मधील शैक्षणिक गुणवत्तेसाठी नियोजन व सनियंत्रण या सदरात शैक्षणिक आराखड्याबाबत म्हंटले गेले आहे:

"सध्या शालेय अभ्यासक्रमाचा शैक्षणिक आराखडा ही बहुतांशपणे 'वरून खाली' [Top to Bottom] अशी होणारी एक वार्षिक कसरत असते. त्याचा मुख्य भर वर्षभरात शिकवण्याच्या विषयांना वेळ वाटून देण्यावर असतो, त्याचबरोबर इतर कोणते उपक्रम करायचे आहेत त्याचा उपदेश असतो. ठराविकपणे हे उपक्रम रा.शं.सं.प्र.प. (SECRT) किंवा शिक्षण संचालनालय खाते ह्यांच्याकडून राज्यातल्या सर्व शाळांना सरसकटपणे लागू केले जातात. हा आराखडा अंमलात आणताना प्रत्येक शाळेने स्वतःची गरज ओळखून एक 'संस्थात्मक-आराखडा' तयार करावा व ठराविक काळासाठी विकसित होणाऱ्या कार्यक्रमाचे नियोजन हे महत्वाचे आणि गरजेचे आहे, असे कोठारी आयोगाने जोर देऊन अहवालात नमूद केले होते."

**NCF मध्ये असेही नमूद केले गेले आहे कि,**

"…. खरेखुरे नियोजन हे 'खालून वर' [Bottom to Top] करण्यासाठी व्यवस्थेला तयार करण्याची गरज आहे…. कोणत्या विषयावर / योजनेवर भर द्यायचा हे शाळांनी ठरवले, पुढे केंद्र तसेच गट पातळीवर एकत्रीकरण केले आणि असा खालून वर नियोजनाचा एक व्यापक आराखडा बनवत नेला तर खऱ्या अर्थाने जिल्हा पातळीवरचे विकेंद्रित नियोजन तयार होईल. लक्ष्य आणि उद्दिष्टे ठरवणे त्यासाठी नियोजन करणे आणि त्याला जबाबदार राहणे हे मग सर्वच पातळ्यांवर सहज साध्य होईल."

## वर्ग /मूल निहाय नियोजन म्हणजे काय?

- वर्ग/मुल निहाय नियोजन हे वर्गातील प्रत्येक मुलाचे नियोजन असते (CWSN मुलांसह).
- पाठ्यक्रमाच्या आधारे / पाठ्यपुस्तकातील धडे हे लक्ष ठेवून सर्व मुलांसाठी एकत्रित असे नियोजन न करता अध्ययन निष्पत्ती, त्यातील क्षमता यांचा आधार या नियोजनास असतो.
- केवळ ठराविक अध्ययन निष्पत्ती किंवा क्षमता यात मदतीची आवश्यकता असणाऱ्या मुलांसाठीचे हे नियोजन नसून वर्गातील प्रत्येक मुलाचा क्षमतेच्या दृष्टीने यात विचार केला जातो.
- यात खालील गोष्टींचा समावेश होतो:

- मासिक उद्दिष्टे म्हणून निष्पत्तीची निवड, त्यातील क्षमता ओळखणे.

- क्षमता आणि उपक्रमांची सांगड घालणे. मुल आणि क्षमता याचा विचार करून पाठ्यपुस्तकापलीकडील वैविध्यपूर्ण अध्ययन अनुभव निश्चित करणे. उदा: प्रत्यक्ष अनुभव,चर्चा, वर्कशीट्स, कलाकृती, खेळ, गाणी, गोष्टी, नाटके इत्यादी.

- आवश्यकतेनुसार हे उपक्रम संपूर्ण वर्गसोबत एकत्र, समान/भिन्न क्षमता असणारे छोटे गट, वैयक्तिक सराव अशा स्वरूपाचे असू शकतात.

## वर्ग/मूल निहाय नियोजन कसे करावे?

प्रत्येक मुला-मुलीसाठी आणि प्रत्येक अध्ययन निष्पत्तीवर काम करण्यासाठी पद्धतशीर नियोजन अत्यंत आवश्यक आहे. नियोजनातील स्पष्टता, तपशील हे त्या नियोजनाचे यश-अपयश ठरवतात.

मुलांची शिकण्याची प्रक्रिया ही बहुआयामी असल्याने प्रत्येक मुल शिकावे यासाठी प्रयत्न करायचे असतील तर त्यासाठी नियोजनातही बहुआयामी घटकांचा विचार होणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

शिक्षण परिषदेच्या स्वरुपात नाविन्यपूर्ण उपक्रम सादर करण्याचे, सहकार्यातून शिकण्याचे हक्काचे व्यासपीठ उपलब्ध असताना; शिक्षकांनी बेटासारखे एकेकटे काम करण्याची आवश्यकता नाही.

शिक्षकांच्या स्वतःच्या अनुभवातून, अभ्यासातून केंद्रातील मुलांच्या गरजांसाठी केंद्रपातळीवरच उत्तरे शोधता येऊ शकतात. यातून काही महत्वाच्या गोष्टी साध्य होतात:

• शिक्षकांमधील संघभावना आणि सहकार्यातून केंद्रातील मुलांच्या क्षमतांमध्ये वृद्धी.

• एक दिवस एकत्रित येऊन काम केल्याने केंद्रातील प्रत्येक शिक्षकाचे प्रत्येक मुलासाठीचे नियोजन निश्चित होते. यामुळे:

- महिन्यातील इतर दिवस वर्गप्रक्रियेत आणि पालक/ग्रामस्थांसोबत नेमके काय करायचे आहे याची स्पष्टता राहते.

- संपूर्ण केंद्रातील शिक्षकांच्या नियोजनाचे चिंतनपर परीक्षण करणे केंद्र प्रमुख आणि CRG शिक्षकांना सोयीचे होते. केंद्रातील शिक्षकांच्या दृष्टिकोनाचा, प्राधान्यक्रमाचा एकत्रित अंदाज घेऊन आवश्यक तिथे मदत, बदल करणे त्यांना सुलभ होते.

- केंद्रातील इतर प्रक्रियांबाबत केंद्र प्रमुख, CRG सदस्य यांना स्पष्टता येते. उदा: शाळा भेटी, वर्ग प्रक्रियेतील / शाळा व्यवस्थापन समिती इत्यादी संदर्भात आवश्यक मदतीचे नियोजन करणे.

- मासिक उद्दिष्टांनुसार शिक्षकांचे वर्गात काम लवकरात लवकर सुरु होते. त्यावर आधारित इतर प्रक्रियासुद्धा वेळेत पूर्ण होण्यास मदत होते. उदा. शिक्षकांच्या नियोजन संकलनातून केंद्राचे संकलित नियोजन तयार होते. यावर पुढील गट संसाधन बैठक आणि त्यानंतर जिल्हा संसाधन गटाच्या बैठकीत सादरीकरण, आढावा करणे, मदतीसाठीचे नियोजन करणे सहज शक्य होते.

- शिक्षकांच्या नियोजनाच्या कौशल्यात, मूळ नियोजनात गुणात्मक भर पडल्याने व्यक्तिगत पातळीवर प्रत्येक शिक्षक शिक्षण परिषदेहून परत जात असताना अंमलबजावणीसाठी अधिक सज्ज झाल्याची भावना, आत्मविश्वास यासह परत जाऊ शकतात.

**मुलनिहाय मासिक नियोजन**

| शाळा- | | | | | महिना - | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षकाचे नाव - | | | | | | | |
| विषय - | | | | | वर्ग - | | |
| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | महिन्यासाठी निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तीचे विधान | अध्ययन निष्पत्ती पूर्ततेतील निवडलेल्या क्षमता | क्षमता आधारित मदतीची गरज असणारी मुले | क्षमता प्राप्त होण्यासाठी आवश्यक उपक्रम / अनुभव | क्षमतानिहाय मूल्यमापन | निरीक्षणात्मक नोंदी |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

Scanned with CamScanner

## अध्ययन निष्पत्ती आधारित वर्ग/मुल निहाय नियोजन कृतीकार्याक्रम

शिक्षण परिषदेमध्ये सर्व शिक्षकांनी आपल्या वर्गासाठी वर्ग/मुल निहाय नियोजन प्रपत्रातील पाठ्यपुस्तकातील संदर्भ इथपर्यंतची माहिती भरून झाल्यानंतर, केंद्रप्रमुखांना संपूर्ण केंद्राचे मासिक उद्दिष्ट स्पष्ट होण्यास मदत होते. शिक्षण परिषदेनंतर-


१. **शिक्षक**

- प्रपत्रातील उरलेली माहिती वैयक्तिक पातळीवर भरतील. यातील निरीक्षणाच्या नोंदी या मुलांचे वेळोवेळी निरीक्षण करून भरावयाच्या आहेत.
- नियोजनानुसार वर्गात अंमलबजावणी करतील

२. **केंद्रप्रमुख**

- सर्व शिक्षकांच्या नियोजनाचे संकलन करून त्यानुसार केंद्राचे नियोजन तयार करतील.
- प्रभावी अंमलबजावणी साठी शिक्षकांना आवश्यक मदत पुरवतील, सहाय्य करतील.
- पुढील शिक्षण परिषदे आधी शाळा भेटी, शिक्षक/मुल/पालक संवाद या मार्फत वर्ग/मुल निहाय नियोजनाविषयीचा अनुभव समजून घेतील. पुढील नियोजनासाठी उपयुक्त नोंदी करतील.

**प्रत्येक मुलाचा विचार करून शिक्षण परिषदे मध्ये तयार होणारे हे वर्ग/मुल निहाय नियोजन एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. या अनुषंगाने सलगच्या २ शिक्षण परिषदांमधील महत्वाचे टप्पे खाली दिलेले आहेत.**




Scanned with CamScanner